प्रेस नोट

विषय: जागतिक हृदय दिनानिमित्त आयोजित सीपीआर प्रशिक्षण व AED (ऑटोमॅटिक एक्सटर्नल डेफिब्रिलेटर) मशीनचे उद्घाटन यशस्वीरीत्या पार पडले बाबत

दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी जागतिक हृदय दिनाच्या निमित्ताने पुणे महानगरपालिका आयुक्त मा.नवलकिशोर राम यांचे मार्गदर्शनाखाली पुणे महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (जुना जी.बी. हॉल, तिसरा मजला) येथे एक महत्वाचा आरोग्य उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या प्रसंगि रिव्हीव्ह हार्ट फाउंडेशन चे राष्ट्रीय समन्वयक डॉ. किंजल गोयल, हृदयरोगतज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ, श्री.भीमाशंकर , रोटरी क्लब लक्ष्मी रोड चे सदानंद भागवत, दीपा भागवत, तसेच पुणे महानगरपालिकेचे विविध विभागातील मान्यवर अधिकारी उपस्थित होते

या उपक्रमांतर्गत पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कार्डियोपल्मोनरी रेससिटेशन (सीपीआर) प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणाचे मार्गदर्शन डॉ. जगदीश हिरेमठ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. डॉ. हिरेमठ यांनी हृदयविकाराच्या तात्काळ उपचारासाठी सीपीआरचे महत्त्व आणि योग्य पद्धतीने त्याचा वापर कसा करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात सहभागी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सीपीआरची तांत्रिक कौशल्ये आत्मसात केली तसेच हाताळणीचा सरावही केला, ज्यामुळे अपघाती हृदयविकाराच्या प्रसंगी त्वरित व प्रभावी प्रतिसाद देण्यास ते सक्षम होतील.

याच दिवशी पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या तिसऱ्या मजल्यावर अत्याधुनिक AED (ऑटोमॅटिक एक्सटर्नल डेफिब्रिलेटर) मशीनचे उद्घाटन देखील करण्यात आले. AED मशीन हे आपत्कालीन हृदयविकाराच्या वेळेस वापरण्यासाठी डिझाइन केलेले उपकरण असून, हृदयाचा अनियमित व चुकलेला ठोका (अरिदमिया) सुधारण्यासाठी व हृदयाला पुनःसंचालनासाठी विद्युत शॉक देण्याचे काम करते. हे मशीन त्वरित हृदयविकाराच्या प्रसंगी रुग्णाचे जीव वाचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. उद्घाटन कार्यक्रमाचे नेतृत्व डॉ. जगदीश हिरेमठ यांनी केले. त्यांनी AED चा योग्य वापर कसा करावा, त्याचे फायदे व त्यासंबंधित सुरक्षा खबरदाऱ्या याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.

या उपक्रमांचे आयोजन आरोग्य विभाग (पुणे महानगरपालिका), पुणे महानगरपालिका, रिव्हीव्ह हार्ट फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ लक्ष्मी रोड पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी या उपक्रमाला अत्यंत उत्साहाने सहभागी झाले. हृदयविकार प्रतिबंध व प्राण वाचविण्याच्या या तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणामुळे त्यांच्या जागरुकतेत व आपत्कालीन प्रतिसाद क्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे.

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाने हे उपक्रम आरोग्य सुरक्षा व आपत्कालीन परिस्थितींसाठी जागरूकता वाढवण्यासाठी महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले असून, भविष्यात अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्याचे आश्वासन दिले आहे.

(डॉ. निना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका